# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत सन
**{समाज विकास विभाग}** २०२३-२४ या आर्थिक वर्षात वैयक्तिकरित्या अल्प आय गटातील गरीब, गरजू, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत महिलांना तसेच सामुहिकरित्या महिला बचत गटांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोणातुन पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून शिवणयंत्र प्रशिक्षण प्रमाणपत्र प्राप्त महिलांना शिवणयंत्र वाटप करण्याचे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेण्याबाबत.

**अटी व शर्ती :-**

१. शिवणयंत्र मागणीबाबतचा अर्जदार महिलेचा एक अर्ज सादर करावा.
२. बी.पी.एल. प्रमाणपत्र किंवा पिवळी शिधापत्रिका किंवा प्राधान्यक्रम असलेली शिधापत्रिका सादर करणे आवश्यक राहिल.
३. अर्जदार महिलेचे आधारकार्ड आवश्यक आहे.
४. अर्जदार महिलेचे स्वत:च्या नावाची बँक पासबुकची झेरॉक्स प्रत जोडावी.
५. उत्पन्न प्रमाणपत्र (उत्पन्न प्रमाणपत्र रु. १ लक्ष व त्यापेक्षा कमी असणे आवश्यक राहिल.
६. २ पासपोर्ट फोटो जोडावे.
७. प्रतिज्ञापत्र (याआधी कुठल्याही शासकीय शिवणयंत्र योजनेचा लाभ घेतला नसल्याचे व कोणत्याही शासकीय / निमशासकीय सेवेत नोकरी करीत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहिल.)
८. नागपूर शहरात रहिवासी असल्याचे रहिवासी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.
९. शासकीय, निमशासकीय किंवा इतर शिवणयंत्राचे प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडुन शिवणयंत्राचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.
१०. महिला बचत गट DAY - NULM पोर्टलवर नोंदणीकृत असावा. एका महिला बचत गटास एकदा शिवणयंत्राचा लाभ दिल्यानंतर दुबार लाभ देता येणार नाही.
११. सन २०१८ - १९ या आर्थिक वर्षापुर्वीचा गट नोंदणीकृत आणे आवश्यक राहिल.
१२. गटातील सदस्य विधवा, परित्यक्ता, एकल महिला असल्यास शिवणयंत्र देण्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल, नसल्यास गटातील साधारण महिला सदस्यास सुध्दा शिवणयंत्र देता येईल. तथापि याकरिता ज्या गटातील महिला सदस्येस लाभ द्यावयाच्या आहे त्यांना योजनेचा लाभ देण्याचा गटाचा ठराव आवश्यक राहिल.
१३. महिला बचत गटातील एक सदस्यास शिवणयंत्र देण्यात येईल.
१४. अर्जदार महिलेचे वय १८ ते ५५ वर्ष इतके आवश्यक राहिल. (जन्माचा दाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.)
१५. एका झोनमधुन आवश्यकतेपेक्षा जास्त अर्ज आल्यास व ते निकषा प्रमाणे पात्र ठरल्यास त्यांची निवड ईश्वर चिठ्ठीव्दारे करण्यात येईल.
१६. एखाद्या झोनमधुन आवश्यकतेनुसार अर्ज प्राप्त न झाल्यास शिल्लक लाभार्थी प्रमाण इतर झोनमध्ये अधिक प्राप्त झालेल्या अर्जामध्ये समायोजित करण्यात येईल.
१७. पात्र महिला लाभार्थ्यांना स्वत: शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशीव्दारे खातर जमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर देण्यात येईल.

सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षात एका शिवणयंत्राची किंमत रु. ११,५००/- निश्चित करण्यता आली असून एकूण ४२० (प्रति झोन ४२) प्रमाणे ४२० (लाभार्थी ) x रु. ११,५००/- = रु. ४८,३०,०००/- (अक्षरी अठ्ठेचाळीस लक्ष तीस हजार रुपये फक्त) खर्च अपेक्षित आहे.

मनपाच्या १० झोनमधुन प्रत्येक झोननिहाय ५० टक्के वैयक्तिक व ५० टक्के महिला बचत गटास निकषाच्या अधिन राहून शिवणयंत्राचा लाभ देण्यात येईल. अशा प्रकारे २१ वैयक्तिक महिला तथा २१ महिला बचत गटानुसार लाभार्थ्यांची प्रत्येक झोनमधुन निवड करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. डीसीटी २३१६/प्र.क्र.१३३ का/१४१७, दि. ०५/१२/२०१६ अन्वये महिला लाभार्थ्यांनी शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशी अंती खातरजमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर लाभार्थ्यांचे बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

सबब, शिवणयंत्र वाटप योजना राबविण्याकरिता महिला व बाल कल्याणच्या पद क्र. ६४६ (A४ – ७००२४७३८०३) मधून करण्याकरिता येणार रु. ४८,३०,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे ठराव मान्यतेस सादर.

टिप :- सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 636/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 08/12/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात वैयक्तिकरित्या अल्प आय गटातील गरीब, गरजू, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत महिलांना तसेच सामुहिकरित्या महिला बचत गटांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोणातुन पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून शिवणयंत्र प्रशिक्षण प्रमाणपत्र प्राप्त महिलांना शिवणयंत्र वाटप करण्याचे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

**अटी व शर्ती :-**

१. शिवणयंत्र मागणीबाबतचा अर्जदार महिलेचा एक अर्ज सादर करावा.
२. बी.पी.एल. प्रमाणपत्र किंवा पिवळी शिधापत्रिका किंवा प्राधान्यक्रम असलेली शिधापत्रिका सादर करणे आवश्यक राहिल.
३. अर्जदार महिलेचे आधारकार्ड आवश्यक आहे.
४. अर्जदार महिलेचे स्वत:च्या नावाची बँक पासबुकची झेरॉक्स प्रत जोडावी.
५. उत्पन्न प्रमाणपत्र (उत्पन्न प्रमाणपत्र रु. १ लक्ष व त्यापेक्षा कमी असणे आवश्यक राहिल.
६. २ पासपोर्ट फोटो जोडावे.
७. प्रतिज्ञापत्र (याआधी कुठल्याही शासकीय शिवणयंत्र योजनेचा लाभ घेतला नसल्याचे व कोणत्याही शासकीय / निमशासकीय सेवेत नोकरी करीत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहिल.)
८. नागपूर शहरात रहिवासी असल्याचे रहिवासी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

९. शासकीय, निमशासकीय किंवा इतर शिवणयंत्राचे प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडुन शिवणयंत्राचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

१०. महिला बचत गट DAY - NULM पोर्टलवर नोंदणीकृत असावा. एका महिला बचत गटास एकदा शिवणयंत्राचा लाभ दिल्यानंतर दुबार लाभ देता येणार नाही.

११. सन २०१८ - १९ या आर्थिक वर्षापुर्वीचा गट नोंदणीकृत आणे आवश्यक राहिल.

१२. गटातील सदस्य विधवा, परित्यक्ता, एकल महिला असल्यास शिवणयंत्र देण्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल, नसल्यास गटातील साधारण महिला सदस्यास सुध्दा शिवणयंत्र देता येईल. तथापि याकरिता ज्या गटातील महिला सदस्येस लाभ द्यावयाच्या आहे त्यांना योजनेचा लाभ देण्याचा गटाचा ठराव आवश्यक राहिल.

१३. महिला बचत गटातील एक सदस्यास शिवणयंत्र देण्यात येईल.

१४. अर्जदार महिलेचे वय १८ ते ५५ वर्ष इतके आवश्यक राहिल. (जन्माचा दाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.)

१५. एका झोनमधुन आवश्यकतेपेक्षा जास्त अर्ज आल्यास व ते निकषा प्रमाणे पात्र ठरल्यास त्यांची निवड ईश्वर चिठ्ठीव्दारे करण्यात येईल.

१६. एखाद्या झोनमधुन आवश्यकतेनुसार अर्ज प्राप्त न झाल्यास शिल्लक लाभार्थी प्रमाण इतर झोनमध्ये अधिक प्राप्त झालेल्या अर्जामध्ये समायोजित करण्यात येईल.

१७. पात्र महिला लाभार्थ्यांना स्वत: शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशीव्दारे खातर जमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर देण्यात येईल.

सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षात एका शिवणयंत्राची किंमत रु. ११,५००/- निश्चित करण्यता आली असून एकूण ४२० (प्रति झोन ४२) प्रमाणे ४२० (लाभार्थी ) x रु. ११,५००/- = रु. ४८,३०,०००/- (अक्षरी अठ्ठेचाळीस लक्ष तीस हजार रुपये फक्त) खर्च अपेक्षित आहे.

मनपाच्या १० झोनमधुन प्रत्येक झोननिहाय ५० टक्के वैयक्तिक व ५० टक्के महिला बचत गटास निकषाच्या अधिन राहून शिवणयंत्राचा लाभ देण्यात येईल. अशा प्रकारे २१ वैयक्तिक महिला तथा २१ महिला बचत गटानुसार लाभार्थ्यांची प्रत्येक झोनमधुन निवड करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. डीसीटी २३१६/प्र.क्र.१३३ का/१४१७, दि. ०५/१२/२०१६ अन्वये महिला लाभार्थ्यांनी शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशी अंती खातरजमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर लाभार्थ्यांचे बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

सबब, शिवणयंत्र वाटप योजना राबविण्याकरिता महिला व बाल कल्याणच्या पद क्र. ६४६ (A४ – ७००२४७३८०३) मधून करण्याकरिता येणार रु. ४८,३०,०००/- खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**